**Publication: Gavakari** **Date: Monday, 24th November, 2014**

**Edition: Nasik**

# इंडिया फर्स्ट इन्शुरन्सतर्फे 'हॅप्पी इंडिया'चे अनावरण

। मुंबई ।

नाविन्यपूर्ण कल्पना आणि बदल घडवण्याची तीव्र इच्छा असलेल्या तरुण बदलकर्त्यांना सामावून घेण्यासाठी इंडिया फर्स्ट लाइफ इन्शुरन्सने 'हॅप्पी इंडिया' या सामाजिक बदलाच्या उपक्रमाचे आयोजन ११ ते १६ वर्षे वयोगटातील मुलांसाठी केले आहे. कंपनीच्या पाचव्या वर्धापनदिनानिमित्त हा उपक्रम आयोजित केला आहे.

या उपक्रमाची घोषणा कंपनीच्या पाचव्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात इंडिया फर्स्ट लाइफ इन्शुरन्सचे चीफ मार्केटिंग ऑफिसर मोहित रोचलानी यांनी केली.

या उपक्रमाच्या अनावरणाच्यानिमित्ताने बोलताना रोचलानी म्हणाले की, 'भारतात बदलाचे वारे वाहू लागले आहेत. नवीन सरकार भारताला चांगले करण्यासाठी अनेक नवीन उपक्रम हाती घेत आहे. अगदी वित्तीय समावेशापासून ते 'मेक इन इंडिया' आणि 'स्वच्छ भारत अभियाना'पर्यंत. भाग केवळ मागणी करून नाही तर बदल घडवून होण्याची संधी देता येणार आहे.

हॅप्पी इंडियाचे उद्दिष्ट तरुण बदलकर्त्यांना शोधण्याचे व त्यांच्या 'आयडियाज फॉर चेंज' ची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्य करण्याचे आहे. यात १५ शहरांमधील ५०० शाळांमधील २० हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी सहभागी होणार आहेत.तरुण मुले त्यांना खटकणारे सामाजिक प्रश्न पाहतील आणि हे प्रश्न सोडवण्याच्या त्यांच्या कल्पनांबाबत माहिती देतील. इंडिया फर्स्ट लाइफ त्यानंतर २५ सर्वोत्तम 'आयडियाज फॉर चेंज' ना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे अनुदान देऊन या तरुण बदलकर्त्यांना त्यांच्या स्वप्नातील बदल घडवून आणण्यास सहकार्य देतील.या उपक्रमाला बँक ऑफ बडोदा आणि आंध्र बँकेने सहकार्य केले असून त्याची वैधता आणि प्रक्रिया प्रमाणिकरणाची जबाबदारी केपीएमजी या ज्ञान भागीदारांनी घेतली आहे.या सर्वोत्तम २५ बदलाच्या कल्पनांना इंडिया फर्स्टकडून फेब्रुवारी महिन्यात एका हॅप्पी इंडिया राष्ट्रीय परिषदेचे आयोजन केले जाईल. त्यात २५ संघ आपले प्रकल्प कॉर्पोरेट उद्योग समूह, महत्वाची सामाजिक व्यक्तिमत्वे आणि मीडियासमोर सादर करतील.

या विद्यार्थ्यांचे प्रयत्न इंडिया फर्स्ट आणि सृष्टी पब्लिशर्स यांनी संयुक्तरित्या काढलेल्या 'यंग चेंज मेकर्स' या पुस्तिकेत प्रकाशित करण्यात येतील. विद्यार्थी ३ ते ४ विद्यार्थ्यांचा संघ करून यात सहभागी होऊ शकतात. तरी www.happyindia.indiafirstlife.com.या वेबसाईटवर किंवा happyindia.indiafirstlife.com.यासाठी नोंदणीचा अंतिम दिनांक ८ डिसेंबर असून कल्पना सादरीकरणाची अंतिम तारीख १० डिसेंबर आहे. याशिवाय प्रकल्प कल्पना सादरीकरण २० डिसेंबर होणार असून अंतिम २५ प्रकल्पांची घोषणा २२ डिसेंबर रोजी होणार आहे. त्यानंतर ७ फेब्रुवारी २०१५

A Joint Venture of Bank of Baroda Legal & General Andhra Bank